महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २९६ वे | दिनांक : २३/१०/२०२६ | वार : शुक्रवार

## ‘SIR रद्द करा’; ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्यासाठी मुंबईत युवक काँग्रेसचे तीव्र आंदोलन




प्रातिनिधिक चित्र

**मुंबई** : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली असून, लोकशाही आणि संविधानाच्या संरक्षणासाठी पक्षाकडून आंदोलन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई उत्तर-पश्चिम जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने गुरुवारी आंदोलन करण्यात आले. ‘लोकशाही बचाव, संविधान बचाव’, ‘SIR रद्द करा’ आणि ‘ज्ञानेशकुमार राजीनामा द्या’ अशा घोषणा देत युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक प्रक्रियेबाबत आपला विरोध व्यक्त केला. दरम्यान, आंदोलनादरम्यान पोलिसांनी आंदोलकांची धरपकड केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या (SIR) प्रक्रियेला विरोध दर्शवत युवक काँग्रेसने हे आंदोलन केले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि लोकशाही मूल्यांच्या संरक्षणाचा मुद्दा उपस्थित करत आंदोलकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या मागण्यांसंदर्भात संबंधित प्रशासनाला निवेदन देण्याची तयारीही आंदोलकांनी केली होती. आंदोलनादरम्यान युवक काँग्रेसचे एक शिष्टमंडळ तहसीलदारांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे अधिकृत निवेदन सादर करणार होते. मात्र, शिष्टमंडळाची भेट होण्यापूर्वीच पोलिसांनी आंदोलकांची धरपकड केली. त्यामुळे निवेदन सादर करण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण झाल्याचे युवक काँग्रेसकडून सांगण्यात आले. पोलिसांच्या या कारवाईमुळे आंदोलनाचा मुद्दा अधिकच चर्चेत आला. पोलिसांच्या कारवाईवर प्रतिक्रिया देताना मुंबई उत्तर-पश्चिम जिल्हा युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष अब्दुल समद यांनी सरकारवर टीका केली. पोलिसांच्या माध्यमातून युवक काँग्रेसचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला असला, तरी हे आंदोलन थांबणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या आंदोलनाचा आवाज कोणीही दडपू शकत नाही, असे समद म्हणाले. सरकार पोलिसांना पुढे करून विरोधी पक्षांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. मतदार यादी आणि निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमिततांविरोधातील ‘वोटचोरी’चे आंदोलन यापुढेही सुरूच राहील, असा इशारा त्यांनी दिला. लोकशाही आणि संविधानाच्या संरक्षणाचा मुद्दा पुढे करत युवक काँग्रेसने आपल्या मागण्यांवर ठाम भूमिका घेतली आहे. ‘SIR’ प्रक्रिया रद्द करणे आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी मान्य होईपर्यंत आंदोलनाची भूमिका कायम ठेवणार असल्याचे अब्दुल समद यांनी सांगितले. त्यामुळे मुंबईतील युवक काँग्रेसच्या या आंदोलनातून निवडणूक प्रक्रियेवरून काँग्रेस आणि सरकार यांच्यातील राजकीय संघर्ष पुन्हा तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## गुन्हेगारीत पुणे पाचवे; गृहखाते काय करतंय? सुप्रिया सुळेंचा सवाल



**पुणे** : "महाराष्ट्रात आणि मुंबई-पुण्यात गुन्हेगारीने उच्चांक गाठला आहे. देशाच्या गृह खात्याच्या अधिकृत अहवालानुसार वाढत्या गुन्ह्यांमध्ये पुणे शहर देशात 5व्या क्रमांकावर पोहोचले आहे. मुंबईत सेलिब्रेटींच्या घरांची रेकी होते, घरात बुलेटप्रूफ काचा बसवण्याची नामुष्की येते आणि तुरुंगात बसलेला माणूस उघडपणे गोळीबाराची जबाबदारी घेतो, यावरून राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे स्पष्ट होते. 'महाराष्ट्र माझा कुठे नेऊन ठेवलाय?' असा सवाल विचारण्याची वेळ आज जनतेवर आली आहे," असा घणाघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. मुंबईत घेतलेल्या सविस्तर पत्रकार परिषदेत खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्यातील कायदा-सुव्यवस्था, दुष्काळग्रस्तांना जाहीर केलेली 5,000 रुपयांची तोकडी मदत, बारामती लोकसभा निवडणुकीदरम्यान पीडीसीसी (PDCC) बँकेचा झालेला कथित गैरवापर आणि सेलिब्रिटीजच्या सुरक्षेवरून राज्य व केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. अभिनेता टायगर श्रॉफ आणि सलमान खान यांच्या घराबाहेरील घटनांचा संदर्भ देत खासदार सुळे म्हणाल्या, "टीव्ही चॅनेल्सवर एका बाजूला अभिनेते आणि दुसऱ्या बाजूला हल्लेखोर दाखवले जात आहेत. अक्षय कुमार यांच्या घराच्या काचा बदलून तिथे बुलेटप्रूफ काचा बसवाव्या लागत असल्याच्या बातम्या येत आहेत. मुंबईसारख्या सुरक्षित शहरात नागरिकांना स्वत:च्या घरात सुरक्षित वाटत नसेल, तर हे अत्यंत चिंताजनक आहे.“ "अमिताभ बच्चन, शाहरुख खान, सलमान खान किंवा अक्षय कुमार हे केवळ अभिनेते नसून भारताचे आंतरराष्ट्रीय ब्रँड ॲम्बेसेडर आहेत. ते परदेशात भारताची 'सॉफ्ट डिप्लोमसी' आणि सांस्कृतिक संबंध दृढ करण्याचे काम करतात. अशा राष्ट्रीय आयकॉन्सची सुरक्षा करण्यात हे 'डबल इंजिन' सरकार अपयशी ठरत आहे. तुरुंगात बसलेली व्यक्ती गोळीबाराची कबुली देते आणि पोलीस काहीच करू शकत नाहीत, यावर संसदेच्या आगामी अधिवेशनात आम्ही जाब विचारणार आहोत."दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या शासकीय मदतीवर बोलताना त्यांनी आकडेवारी मांडली. "पंतप्रधान किसान सन्मान योजनेचे 6,000 रुपये आणि राज्य सरकारच्या नमो शेतकरी योजनेचे 6,000 रुपये असे वर्षाला 12,000 रुपये शेतकऱ्यांना मिळायला हवेत. राज्य सरकारने शेवटचा हप्ता 13 मार्च रोजी दिला होता; त्यानंतर नवीन आर्थिक वर्षातील 4,000 रुपये अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाहीत. त्यामुळे थकीत 4,000 आणि आताचे 5,000 असे एकूण 9,000 रुपये शेतकऱ्यांना देणे सरकारचे कर्तव्यच आहे.“ "आदरणीय शरद पवार साहेबांनी सरकारला पत्र लिहून केवळ सूचना केल्या आहेत, कारण आम्हाला दुष्काळाचे राजकारण करायचे नाही. मात्र, पिकांची झालेली नासाडी पाहता शेतकऱ्यांना हेक्टरी 1 लाख रुपयांची थेट मदत दिली पाहिजे. बँकांची सक्तीची कर्जवसुली तात्काळ थांबवली पाहिजे आणि रोजगार हमी योजनेची (नरेगा) कामे युद्धपातळीवर सुरू झाली पाहिजेत."

## संभाजीनगरात व्यावसायिक वादातून मित्राची हत्या; आरोपी पोलिसांत हजर

**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील एन-७ सिडको परिसरात भररस्त्यात घडलेल्या हत्येचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. व्यावसायिक स्पर्धेतून आणि अंतर्गत वैमनस्यातून एका २२ वर्षीय तरुणाने आपल्याच जवळच्या मित्राचा अत्यंत निर्घृणपणे काटा काढला आहे. आधी पाठीमागून भरधाव कारने जोरदार धडक दिली आणि त्यानंतर यू-टर्न घेत जखमी अवस्थेत तडफडणाऱ्या मित्राच्या डोक्यात लोखंडी रॉड आणि लाकडी दांड्याने सपासप वार करून त्याची जागीच हत्या केली. देवेश उर्फ बंटी चंद्रेश दीक्षित (वय ३६) असे मयत तरुणाचे नाव असून, पवन दिलीप पराशर (वय २२, रा. वानखेडेनगर) असे आरोपीचे नाव आहे. या थरारक हत्येनंतर आरोपी पवन स्वतः कार घेऊन सिडको पोलीस ठाण्यात हजर झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत देवेश उर्फ बंटी दीक्षित आणि आरोपी पवन पराशर यांच्यात गेल्या अनेक दिवसांपासून व्यावसायिक आणि पैशाच्या कारणावरून वाद धुमसत होता. घटनेच्या दिवशी सकाळी बंटी नेहमीप्रमाणे जिम आटोपून आपल्या दुचाकीवरून घरी जात होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६

## मुरूममध्ये विजयादशमी औचित्य: किसान ब्रिगेड कडून मूक पाखरांसाठी 'फिड किट' उपक्रम संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर निसर्गाचा समतोल राखणाऱ्या आणि मानवी जीवन समृद्ध करणाऱ्या मूक पक्ष्यांसाठी मुरूम शहरात एक आगळावेगळा व प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. किसान ब्रिगेड, महाराष्ट्र राज्यच्या वतीने आणि संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रल्हाद (भगत) माळी यांच्या संकल्पनेतून मुरूम पोलीस ठाण्याच्या परिसर व झाडांवर पक्ष्यांसाठी 'फिड किट' (दाण्या-पाण्याची सोय करणारे किट) लावण्यात आले.निसर्गाचा स्वर्ग निर्माण करणाऱ्या पशुपक्ष्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विजयादशमीचा मुहूर्त साधत हा उपक्रम हाती घेण्यात आला. या कार्यक्रमात मुरूम पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक गिते, ज्ञानेश्वर गव्हाणे आणि इतर पोलीस कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षवल्लींनी समृद्ध असलेल्या परिसरात पक्ष्यांसाठी ही 'फिड किट' थाटात लावण्यात आली.यावेळी बोलताना उपस्थितांनी सांगितले की, जरी पशुपक्षी आपले ऋण बोलून व्यक्त करू शकत नसले, तरी त्यांच्यासाठी सेवा करणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे. झाडांची संख्या जास्त असलेल्या ठिकाणी ही किट लावल्यामुळे शहराच्या हरित व वन्य वैभवात भर पडेल.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी किसान ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष प्रल्हाद (भगत) माळी यांच्या मार्गदर्शनाखाली युवराज राजपूत, स्वप्निल जाधव, संदीप बाबळसुरे, प्रवीण राजपूत, श्रावण इंगळे, महेश शिंदे, पवन फुगटे, किरण जाधव, दत्ता भुसाळे, प्रशांत राठोड, ज्ञानेश्वर जाधव, आदित्य चव्हाण आदी पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी मुरूम पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच किसान ब्रिगेडचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण आणि पक्षीप्रेमी नागरिकांमधून या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र जोरदार स्वागत होत आहे. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील पोलीस ठाण्याच्या परिसर व झाडांवर पक्ष्यांसाठी 'फिड किट' बसवताना गणेश पाटील, गिते, ज्ञानेश्वर गव्हाणे, भगत माळी व अन्य.

## स.भु. प्रशालेच्या वाचनकट्ट्यास रतन बोराडे यांचेतर्फे शंभर पुस्तकांची भेट



**छत्रपती संभाजीनगर** : येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक रतन भानुदास बोराडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त बालसाहित्याची शंभर पुस्तके भेट दिली. स. भु. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड दिनेश वकील, सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, सहचिटणीस डॉ. रश्मी बोरीकर, डॉ. सुनील देशपांडे, कोषाध्यक्ष मिलिंद रानडे यांच्याकडे त्यांनी ही पुस्तके सुपूर्द केली. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, उपमुख्याध्यापक गिरीश देशमुख आणि अन्य शिक्षक उपस्थित होते.प्रशालेतील वाचनकट्टा सुरू झाल्यापासून वाचन कट्ट्यावर विद्यार्थी सतत वाचन करण्यासाठी येत असतात. त्यांना बालसाहित्याची अधिक पुस्तके उपलब्ध व्हावीत या उद्देशाने 48 व्या वाढदिवसानिमित्त वाचन कट्ट्यास 48 पुस्तके आणि वर्गातील 52 विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा मिळावी म्हणून प्रत्येकी एक अशी 52 पुस्तके त्यांनी भेट दिली. या शंभर पुस्तकांची एकूण किंमत सुमारे दहा हजार रुपये इतकी आहे. वाढदिवसानिमित्त रतन बोराडे यांनी दिलेल्या पुस्तकभेट उपक्रमाबद्दल मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, उपमुख्याध्यापक गिरीश देशमुख, पर्यवेक्षक विजय चापाईतकर, संजय परदेशी आणि सर्व शिक्षक शिक्षकेतरांनी रतन बोराडे यांचे अभिनंदन केले आहे.

## जलाशयांच्या गाळपेरा जमिनीत चारा लागवडीचा निर्णय; ३० ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याचे प्रशासनाचे आवाहन




**बीड (भगवंत पाळवदे)** : एल निनोच्या पार्श्वभूमीवर दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी बीड जिल्ह्यातील जलाशये आणि तलावांखालील गाळपेरा जमिनीचा वापर केवळ चारा पिके घेण्यासाठी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत गाळपेरा जमिनीत चारा पिके घेण्यासाठी इच्छुक असलेल्यांनी २३ ते ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विहित नमुन्यातील अर्ज संबंधित तालुक्याच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचे आहेत. गाळपेरासाठी उपलब्ध क्षेत्र असलेल्या विविध जलाशयांची सविस्तर यादी प्रशासनाच्या http://beed.gov.in तसेच http://zpbeed.gov.in या अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील सहकारी दूध संघ, दूध उत्पादक संस्था, महिला बचत गट, फार्मर प्रोड्युसर कंपनी (FPO) आणि वैयक्तिक लाभार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत. विहित मुदतीनंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत, याची नोंद घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्राप्त झालेल्या अर्जांमधून पात्र लाभार्थ्यांची निवड बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीमार्फत केली जाईल. या प्रक्रियेचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून, ५ नोव्हेंबर २०२६ रोजी लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे आणि त्यानंतर लगेचच ६ नोव्हेंबर २०२६ रोजी निवडलेल्या लाभार्थ्यांना निविष्ठांचे वाटप केले जाणार आहे.या योजनेअंतर्गत उत्पादित होणाऱ्या हिरव्या वैरणीतून शेतकऱ्यांनी स्वतःकडील पशुधनाची चाऱ्याची गरज भागविल्यानंतर, उर्वरित अतिरिक्त चारा शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार अन्य गरजवंत पशुपालकांना, चारा डेपो किंवा गुरांच्या छावण्यांसाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक राहणार आहे. अर्ज भरताना काही तांत्रिक किंवा इतर अडचणी आल्यास लाभार्थ्यांनी आपल्या तालुक्यातील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी यांच्याशी तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा गाळपेरा समन्वय समितीचे अध्यक्ष विवेक जॉन्सन आणि समितीचे सदस्य सचिव डॉ. आर. डी. कदम (जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांनी केले आहे.

## तुळजापूरच्या पायी भाविकांसाठी मोफत आरोग्य शिबिर



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले)** : तुळजापूरकडे पायी जाणाऱ्या हजारो भाविकांच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची काळजी घेत, मुरूम येथील माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने २२ आणि २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मुरूम-सोलापूर रोडवर मोफत प्रथमोपचार, आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सामाजिक आणि आरोग्यदायी उपक्रमाने पायी जाणाऱ्या वारकरी व भाविकांना मोठा दिलासा दिला आहे. या विशेष शिबिरामध्ये पायी चालणाऱ्या भाविकांची मोफत रक्तदाब आणि रक्तातील साखरेची तपासणी करण्यात आली. प्रवासादरम्यान पायदुखी, थकवा, अंगदुखी किंवा इतर किरकोळ आरोग्य समस्या उद्भवल्यास त्यावर तात्काळ प्राथमिक उपचार आणि आवश्यक ओव्हर-द-काउंटर औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. प्रवासाच्या दगदगीमध्ये भाविकांना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या शिबिरामध्ये अत्यंत उत्साहाने व सक्रिय सहभाग नोंदवत भाविकांना औषधांचे योग्य प्रकारे वितरण केले. विद्यार्थ्यांना या उपक्रमातून प्रत्यक्ष समाजोपयोगी आरोग्यसेवेचा मोलाचा अनुभव मिळाला. दरम्यान, औषधांचा योग्य वापर कसा करावा, याबाबत विद्यार्थ्यांना व भाविकांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे यांनी बहुमूल्य मार्गदर्शन केले.या आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी प्रा. वैष्णवी पाटील यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली. प्रा. सना जमादार, प्रा. सरस्वती शेवाळकर, प्रा. योगेश पाटील, प्रा. सुदीप ढगे, प्रा. प्रियांका काजळे, प्रा. हर्षद बदोले, प्रा. शितल स्वामी, नितीन कंटेकुरे, बालाजी शेळके, किशोर कारभारी यांनी पुढाकार घेतला. माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीने नेहमीप्रमाणे आपली सामाजिक बांधिलकी जपली असून, या आरोग्यसेवेच्या माध्यमातून राबविलेल्या उपक्रमाने तुळजापूरकडे जाणाऱ्या भाविकांना प्रवासात एक मोठा आरोग्यविषयक आधार मिळवून दिला आहे. कॉलेजच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा पाटील माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी च्या वतीने तुळजापूरकडे जाणाऱ्या भाविकांना औषधोपचार करताना प्राचार्य व अन्य.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६


## मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती बाबतचा सुधारीत जी आर जारी



**मुंबई (प्रतिनिधी) :** मराठा समाजाला इतर मागास वर्गीयां प्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा यांचा लाभ अनुज्ञेय करण्या बाबत च्या दि ०५जुन २०२६ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे बाबत तसेच इतर मागास प्रवर्गास असलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शिक्षणशुल्क मराठाविद्यार्थ्यां कडून न घेणेबाबत ची अंत्यन्त महत्वाची मागणी विचारात घेउन मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती बाबतचा सुधारीत जी आर जारी करण्यात आला असुन ही बाब म्हणजे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्नत्याग उपोषणाचे फलित असल्याची बाब पुढे आली आहे. सदरची मागणी अन्नत्याग उपोषण आंदोलन करणारे उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केली होती. दि ९ ऑगस्ट पासुन २४ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रदीर्घ असे अन्नत्याग आंदोलन राज्य भर गाजले होते या उपोषण दरम्यान त्यांची तब्येत वेळो वेळी खालवत गेली होती. मंत्री गिरीष महाजन, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री संजय शिरसाट,मंत्री अतुल सावे यांनी उपोषण स्थगित करण्यासाठी व मुख्यमंत्री यांचे सोबत घटनात्मक व कायदेशीर तरतुदीचे केस लॉ असलेले अत्यंत अभ्यासु पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सादर करण्यासाठी व मंत्रिमंडळ उपसमिती सोबत बैठक घेण्याचे आश्वासितकेले होते. मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक बुधवार,दि १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सह्याद्री अतिथि गृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली होती.त्या मध्ये अन्नत्याग उपोषण आंदोलनकर्ते करणारे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी विविध जी आर मध्ये दुरुस्ती करून मराठा विद्यार्थी वर्गास शैक्षणिक शुल्क आणि इतर मागास वर्ग (ओ बी सी ) प्रवर्गातील विद्यार्थ्याप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा चालू शैक्षणिक वर्षापासून २०२६-२७ लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला होता त्यातील त्रुटी दुरुस्ती करून नवा सुधारीत जी आर काढण्याची महत्वाची मागणी १६ दिवसाच्या अन्नत्याग उपोषणा दरम्यान त्यांनी केलेली होती त्यावरून १४ ऑक्टोबर च्या बैठकीत जोरदार चर्चा झाली त्यात डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी शासन निर्णय दि.०५जुन २०२६अन्वये घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे तसेच शैक्षणिक संस्था तसेच बहुसंख्य महाविद्यालये मराठा विद्यार्थ्यांकडून संपूर्ण शिक्षण शुल्क भरून घेत असल्याची बाब या मंत्रिमंडळ उपसमितीच्यानिदर्शनास त्यांनी आणून दिल्यामुळे राज्य शासनाने दि १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सुधारीत शासनादेश काढला व या संदर्भाने शासनाने मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींवर करावयाच्या कार्यवाहीबाबत इतर मागास प्रवर्गासअसलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शिक्षण शुल्क मराठा विद्यार्थ्यांकडून न घेणेबाबत तसेच सदरशिक्षण शुल्क न भरल्यामुळे प्रवेश प्रक्रियेस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याबाबतची दक्षता घेणे बाबत या जी आर नुसार सक्त ताकीद देण्यात आली असुन सर्व संबंधित विभागांनी आपल्या अधिनस्त शिक्षण संस्था/ महाविद्यालये यांना आवश्यक त्या सुचना / निर्देश देण्यात यावेत तसेच सदर निर्णयाची अंमल बजावणी न करणाऱ्या शिक्षण संस्था/ महाविद्यालये यांच्याविरूध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.तसेच शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांच्या तसेच मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या निर्देशा नुसार संबंधित विभागाकडून करत असलेल्या / केलेल्या कार्यवाहीचा सद्य:स्थिती दर्शकअहवाल तात्काळ सादर करण्याचे आदेश देतांना नमुद करण्यात आले असुन यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे असे आदेश सुद्धा राज्य शासनाच्या वतीने अवर सचिव, महाराष्ट्र शासन ललितकुमार धायगुडे यांनी दिले आहेत.अन्नत्याग आंदोलन कर्ते डॉ राजेंद्र दाते पाटील यांची निवेदनात नमुद बाबी प्रमाणे अधिक व्यापक दुरुस्ती करण्याची मागणी सुद्धा पुर्ण होणे गरजेचे आहे. प्रदीर्घ आंदोलनासाठी नियोजन विनोद काकडे, लक्ष्मणबापु सिरसाट, प्रा शिवानंद भानुसे,गणेश उगले, रेखा वाहटुळे यांनी केले होते. यास गतिमान करण्याची महत्वपूर्ण भूमिका ऋषिकेश कांबळे, मुकुंद सोनावणे, राजेश मुंढे,सय्यद अक्रम, अब्दुल राउफ, शेख जावेद,अमित जाधव,नरेंद्र काळे, शेख जावेद पटेल, थॉमस खरात, पंडित बोर्डे,निखिल काकडे,आबेद कादरी,आर्यन पाटील,विजय काकडे,संतोष मिमरोट,सलीम खामगावकर या सह अनेकांनी केले होते. तर मुंबई मध्ये रामचंद्र शेडगे, संतोष दळवी यासह टीम मुंबईचे सुभाष देसाई, संतोष शेजवळ,राकेश वासदेव या सह अनेक मान्यवरांनी मुंबईतील पाठपुराव्याचे नियोजन केले होते.

## जेईएस महाविद्यालय जालना, येथे एनएसयूआय तर्फे वकृत्व स्पर्धेचे आयोजन



**जालना (प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे)** : जे. ई. एस. महाविद्यालयात जालना, एनएसयूआय जालना शहरच्या वतीने आयोजित भव्य महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा अत्यंत उत्साहात संपन्न झाली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्यात रचनात्मक व वैचारिक जागृती निर्माण करण्यासाठी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील विजेते खालीलप्रमाणे:प्रथम क्रमांक: कु. दिव्या पंजाबराव चव्हाण — रोख ७५१ रुपये, सन्मानचिन्ह व पुस्तक द्वितीय क्रमांक: कु. श्रावणी अनिल गुज्जेटी — रोख ५०१ रुपये, सन्मानचिन्ह व पुस्तक तृतीय क्रमांक: कु. अक्षरा संजय वन्नाल — रोख २५१ रुपये, सन्मानचिन्ह व पुस्तक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांचे विशेष सहकार्य लाभले. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपने सहभाग नोंदवला असून कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन एनएसयूआय जालना शहरचे जिल्हाध्यक्ष श्री.आदित्य चंदनकर यांच्या वतीने करण्यात आले होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. मनोज मेहर यांचे सहकार्य लाभले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुष्काळाच्या झळा

दुष्काळाच्या झळा कसे,<br>
आम्ही सहन करावे.<br>
मेघराजा आतातरी,<br>
ओटी धान्याने भरावे. १

रुसू नको मेघराजा,<br>
शिवारात नाही पाणी.<br>
पेरा नाही पाण्याविना,<br>
वाट पाहे तुझी राणी. २

काळया रानाची तहान,<br>
पावसाने भागवावे.<br>
शेत शिवारात पीक,<br>
आनंदाने जागवावे. ३

तुझ्याविना शेतामध्ये,<br>
कसे पिकेल कपाशी.<br>
बळीराजा रानामध्ये,<br>
आता राहिल उपाशी. ४

आता येरे मेघराजा,<br>
शेत शिवार भिजावे.<br>
मातीमध्ये ओलाव्यात,<br>
बीज मातीत निजावे. ५

बीज मातीत पेरता,<br>
पीक डोलतांना दिसे.<br>
शेत हिरवे पाहून,<br>
बाप आनंदात हसे. ६

तुझी महिमा निराळी,<br>
शेत शिवार फुलते.<br>
तुझ्याविना जग सारे,<br>
बघ दु:खाने बुडते. ७

**नागेश बोंतेवाड,**<br>
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क 9405109103

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६

## काव्यांगण साहित्य मंचातर्फे उमरग्यात दुसरे राज्यस्तरीय कविसंमेलन

**उमरगा :** येथील काव्यांगण साहित्य समूहाच्या वतीने राज्यपातळीवरचे दुसरे काव्यांगण दीपोत्सव कविसंमेलनाचे आयोजन येत्या २५ ऑक्टोबर रोजी पोतदार इंग्लिश स्कूलच्या सभागृहात होणार असल्याची माहिती संमेलनाचे प्रमुख विकास राठोड यांनी दिली. या कार्यक्रमाला महाराष्ट्रभरातून निवडक निमंत्रित साहित्यिक कवी सहभागी होणार आहेत.या राज्यपातळीवरच्या कविसंमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिध्द साहित्यिक तथा व्याख्याते अहिल्यानगरचे मा.सुभाष सोनवणे ,उद्घाटक उमरगा लोहारा विधानसभेचे आमदार मा. प्रवीण स्वामी ,उदघाटक. मा प्रा. दिलीप पवार उमरगा,स्वागताध्यक्ष पोतदार इंग्लिश स्कूलचे प्राचार्य, मा.बि.पी.सिंग, प्रमुख पाहुणे समाज विकास संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते आणि साहित्यिक विचारवंत मा.भूमिपुत्र वाघ, मा. डॉ. संजय राठोड, कवयित्री,गीतकार मा. सुवर्णा पवार, इचलकरंजी हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.गेल्या अनेक वर्षापासून काव्यांगण साहित्य मंचाचे संस्थापक अध्यक्ष मा. विकास राठोड यांनी उमरगा आणि पंचक्रोशीत साहित्यिक चळवळ अत्यंत तळमळीने आणि मोठ्या उत्साहाने सुरुवात केली आहे.साहित्य हा समाजाचा आरसा आहे, समाजाचे वास्तव हे साहित्यातून प्रतिबिंबित होत असते. कविता म्हणजे मानवी मनाचा भावनात्मक असा अविष्कार असतो. कवीची कल्पनाशक्ती प्रतिभा आणि भावनात्मक अविष्कार यातून समाजातले, निसर्गातले आणि आपल्या मनातले उत्स्फूर्त वास्तव कविता या साहित्य प्रकारातून चित्रित होत असते. साहित्यिकांना विचारपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विकास राठोड हे नेहमीच अव्यहातपणे धडपडत असतात. काव्यांगण साहित्य मंच यातर्फे यावर्षीही २५ऑक्टोबरला दुसरे राज्यस्तरीय कवी संमेलन घेण्याचे योजिले आहे ,असे अध्यक्ष विकास राठोड यांनी बोलताना सांगितल. सर्व सहभागी कवींना काव्यांगण साहित्य समूहातर्फे प्रोत्साहन देण्यासाठी सन्मानचिन्ह आणि गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर साहित्य समाजसेवा आणि शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या साहित्य कलावंत यांना त्यांच्या कार्याची गती द्विगुणित करण्यासाठी काव्यांगण साहित्य मंचातर्फे विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. त्यात काव्यदीप पुरस्कार २०२६डॉ.स्वाती खंदारे, पुणे यांना जाहीर झाला असून अॅड दिलीप कांबळे, धाराशिव(आदर्श समाजसेवक पुरस्कार..2026),सुभाष चव्हाण, धाराशिव(आदर्श शिक्षक पुरस्कार..2026),मंगल बोराडे, तुळजापूर(उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार 2026),सुदर्शन जोशी, धाराशिव, (उत्कृष्ट निवेदक पुरस्कार..2026)गौतम अंबादास बाकले, धाराशिव,(आदर्श समाजसेवक पुरस्कार 2026),भावना गांधीले, अहिल्यानगर,(आदर्श शिक्षिका पुरस्कार2026),वर्षा ननवरे, इंदापूर,(काव्यदीप पुरस्कार 2026),अमेय मुळे, डोंबिवली(उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार 2026),शमशाद जावेद पटेल, सोलापूर(आदर्श शिक्षिका पुरस्कार 2026),रंजिता पवार, उमरगा (आदर्श समाजसेविका पुरस्कार 2026),भाग्यश्री देवकते (बाचके )उमरगा (उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार 2026),प्रा. निशा घोसले जमादार, लातूर (हिरकणी पुरस्कार 2026),मा.अनुराधा मारचट्टीवार, हैद्राबाद (रणरागिणी पुरस्कार 2026) असे एकूण चौदा पुरस्कार देण्याचे काव्यांगण समूहाचे अध्यक्ष विकास राठोड, उपाध्यक्ष अयान मौजन, सचिव वृंदा गंभीर, कार्याध्यक्ष मा. नागसेन कांबळे, सहसचिव स्नेहा जाधव आणि कोषाध्यक्ष सिद्धीविनायक शिंदे यांनी जाहीर केले आहे .या कविसंमेलनाचा आणि आनंदसोहळ्याचा जास्तीत जास्त रसिक व काव्यप्रेमिनी आस्वाद घ्यावा असे आवाहनही काव्यगण साहित्य मंचाच्या वतीने करण्यात आले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# ह.भ.प. न्यायाचार्य डॉ. नामदेवशास्त्री महाराज होणे सोपे नाही



आजच्या काळात एक साधं सत्य आहे - माणूस पदाला चिकटतो, पद माणसाला नाही. नगरसेवक पदासाठी घरं विकली जातात, सोसायटीच्या अध्यक्षपदासाठी कोर्ट-कचेऱ्या होतात, एका संघटनेच्या कार्याध्यक्ष पदासाठी मित्रांचे गळे कापले जातात. अशा या स्वार्थाच्या बाजारात, ऐश्वर्यसंपन्न, कोट्यवधींची मालमत्ता असलेल्या, लाखो भक्तांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणाऱ्या श्रीक्षेत्र भगवानगडाच्या महंत पदाची गादी हसतमुखाने दुसऱ्याच्या हाती सोपवणे... ही घटना नाही, हा इतिहास आहे.म्हणूनच म्हणतो, न्यायाचार्य ह. भ. प. डॉ. नामदेवशास्त्रीजी होणे सोपे नाही.१. भगवानगड म्हणजे काय, हे आधी समजून घ्यावे लागेल...भगवानगड म्हणजे दोन-चार मंदिरांचा समूह नाही. तो एक विचार आहे. संत भगवानबाबांनी आपल्या अथक मेहनत व परिश्रमाने गावोगावी जाऊन उपाशी-तापाशी राहून उभा केलेला हा ज्ञान, वैराग्य , शक्ती आणि भक्ती चा हा गड आहे. श्रमिकांचा ऊसतोड कामगारांच्या श्रमातून व घामातून ऊभा राहिलेला हा गड आहे.जिथे कधी काळी काटेरी झुडपे होती, तिथे आज वारकरी संप्रदायाचा गजर आहे. वारकरी चळवळीचे मोठे केंद्र आहे.आज भगवानगड म्हणजे कोट्यवधी रुपयांची उलाढाल, शेकडो एकर जमीन,लाखो वारकरी, राजकारण्यांची मांदियाळी, आणि अमर्याद सत्ता. या गडावर जे बसतात ते फक्त महंत नसतात, ते एका साम्राज्याचा अनभिषिक्त सम्राट असतात.अशा सम्राटाच्या सिंहासनावर बसून, "हे माझे नाही, हे वारकऱ्यांचे आहे, हे भगवानबाबांचे आहे" असे म्हणणे, आणि ते प्रत्यक्ष कृतीतून दाखवणे, यासाठी छत्रपती शिवरायांसारखे वैराग्य लागते. डॉ. नामदेवशास्त्रीजींनी तेच दाखवले.त्यांनी गादी सोडली नाही, त्यांनी गादीला मोकळा श्वास दिला. "मी गेलो तरी गड राहिला पाहिजे, परंपरा वाढली पाहिजे" ही भावना फक्त संताच्या मनातच येऊ शकते.२. तो त्याग आहे - वैराग्याचा कळसत्याग दोन प्रकारचा असतो. एक - नसलेल्याचा त्याग. माझ्याकडे काहीच नाही, म्हणून मी त्यागी आहे, असे म्हणणे सोपे. दुसरा - असून नसल्यासारखे वागणे. हातात सगळे असूनही, मनाने भिकारी राहणे, हा खरा त्याग.भगवानगडाच्या गादीवर बसणाऱ्या व्यक्तीच्या पायावर लोटांगण घेण्यासाठी मंत्री रांगेत उभे राहतात. त्याच्या एका हाकेवर हजारो तरुण, वारकरी धावून येतात. एवढी अफाट शक्ती, एवढा पैसा, एवढी प्रसिद्धी पायाशी लोळण घेत असताना, त्याचा मोह मनाला लागू न देणे, याला साधना लागते.महंत डॉ. नामदेवशास्त्री महाराज हे केवळ परंपरेचे महंत नाहीत, ते एक विद्वान आहेत. संस्कृतचे गाढे अभ्यासक, वेदशास्त्रसंपन्न, कीर्तन-प्रवचनातून लाखोंना मार्गदर्शन करणारे विचारवंत. ज्ञानेश्वरीचे अभ्यासक व तत्वचिंतक, त्यांनी गडाला केवळ भौतिक वैभव दिले नाही, तर वैचारिक अधिष्ठान दिले. अशा विद्वत्तेच्या शिखरावर असलेल्या माणसाने, आपल्या शिष्याला पुढे करणे, हा त्यागाचा कळस आहे.३. तो संस्कार आहे - गुरु-शिष्य परंपरेचा दीपस्तंभआजकाल काय चित्र आहे? गुरु मयत झाला की शिष्य गादीसाठी भांडतात. कोर्टात केसेस टाकतात. एकमेकांवर चिखलफेक करतात. मठ, मंदिरे, गाद्या या सगळ्याचे बाजारीकरण झाले आहे. रक्ताचे भाऊसुद्धा संपत्तीसाठी एकमेकांचे वैरी होतात, तिथे गुरु-शिष्याची गोष्टच वेगळी.पण भगवानगडाने या कलियुगातही एक वेगळा आदर्श निर्माण केला.न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आपल्या उत्तराधिकाऱ्याला घडवले, वाढवले, आणि वेळ आल्यावर मोठ्या मनाने, सर्वांसमक्ष, हसतमुखाने गादीवर बसवले. त्यांच्या डोळ्यात द्वेष नव्हता, मनात आकस नव्हता, तर एक समाधान होते - "माझ्या भगवानबाबांची परंपरा पुढे चालली."एका वटवृक्षाने आपल्या सावलीत वाढलेल्या नव्या रोपाला म्हणावे, "आता तू वाढ, मी तुझ्या पाठीशी आहे." याला यज्ञ म्हणतात. डॉ. शास्त्रीबाबांनी तो यज्ञ केला. हा संस्कार फक्त संत भगवानबाबांच्या विचार व त्यागातूनच मिळू शकतो.४. तो संयम आहे - भगवी वस्त्रे घालणे सोपे आहे, हो... बाजारात ५०० रुपयांत मिळतात. पण भगवी वृत्ती अंगात बाणवणे महाकठीण.मनात एकदा सत्तेचा अहंकार आला की, माणूस आंधळा होतो. त्याला वाटते, मीच सर्वस्व आहे. माझ्याशिवाय गड चालणार नाही, माझ्याशिवाय संस्था चालणार नाही. हा अहंकारच माणसाला संपवतो.डॉ. नामदेवशास्त्री बाबांनी या अहंकाराला कधीही जवळ येऊ दिले नाही. ते महंत असूनही सेवक म्हणून राहिले. प्रचंड शिस्त, करारीपणा यामुळे ते कधीही डगमगले नाही. त्यांनी दाखवून दिले की, गादी ही उपभोगासाठी नसते, ती सेवेसाठी असते. गड हा व्यक्तीचा नसतो, तो विचाराचा असतो.आज अनेक मठाधिपती आयुष्याच्या शेवटपर्यंत गादीला चिकटून राहतात. मृत्यूनंतरही त्यांची गादी रिकामी करण्यास लोक घाबरतात. अशा वेळी, जिवंतपणी, ठणठणीत असताना, सर्व वैभव असताना, स्वतःहून बाजूला होऊन नव्या पिढीला वाट मोकळी करून देणे, हा संयमाचा, वैराग्याचा आणि दूरदृष्टीचा कळस आहे.५. आजच्या पिढीला काय शिकायचे आहे?आम्ही तरुणांनी, आम्ही कार्यकर्त्यांनी, आम्ही पदाच्या मागे धावणाऱ्या सामान्य माणसांनी या घटनेतून तीन गोष्टी शिकल्या पाहिजेत.पहिली - पदापेक्षा परंपरा मोठी असते. पद आज आहे, उद्या नाही. पण परंपरा टिकली पाहिजे. डॉ. नामदेव शास्त्रीबाबांनी पद सोडले, पण परंपरा मोठी केली.दुसरी - संपत्तीपेक्षा मन मोठे असते.भगवानगडाकडे वैभव अफाट आहे, पण त्यापेक्षा मोठे आहे डॉ.शास्त्रीबाबांचे मन. मनाने श्रीमंत असणे, हीच खरी श्रीमंती.तिसरी - सोडण्यातच खरे सुख आहे. मुठ घट्ट बंद केली तर त्यात काहीच येत नाही, पण मुठ उघडली तर आकाशाही हातात येते. डॉ. नामदेव शास्त्रीबाबांनी मुठ उघडली आणि आकाशाला कवेत घेतले.म्हणूनच म्हणावेसे वाटते -खुर्च्या अनेकांना मिळतात, पण गादी क्वचित कुणाला मिळते.गादी अनेकांना मिळते, पण ती टिकवण्याचे कर्तृत्व क्वचित कुणात असते.कर्तृत्व अनेकात असते, पण ती सोडण्याचे धैर्य क्वचित कुणात असते.आणि सोडण्याचे धैर्य अनेकात असते, पण हसतमुखाने सोपवण्याचे औदार्य फक्त संतांमध्येच असते.असे संत म्हणजे न्यायाचार्य डॉ. नामदेवशास्त्री महाराज.त्यांच्या या अलौकिक त्यागाला, त्यांच्या या वैराग्यवृत्तीला, त्यांच्या या मोठ्या मनाला.

**डॉ. शिवाजी हुसे**
**मो ९४०४०००३९८**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६


## स्वातंत्र्याची ८० वर्षे उलटली, तरी ठाकरवाडीचा ५०० मीटर रस्ता डांबरीकरणाच्या प्रतीक्षेत



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** भारताला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे उलटली, तरी निरगुडी बु ते ठाकरवाडीपर्यंत जाणाऱ्या अवघ्या ५०० मीटर रस्त्याचे आजपर्यंत डांबरीकरण किंवा काँक्रिटीकरण झालेले नसल्याची बाब समोर आली आहे.ठाकरवाडीच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला हा रस्ता अद्याप पक्का न झाल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या प्रश्नाकडे लक्ष देणार तरी कधी, असा सवाल उपस्थित होत आहे.खुलताबाद गंगापूर तालुक्यातील आमदार फक्त मतदानाच्या वेळेस गावांना भेटी देतात आणि विकासाच्या गप्पा मारतात आणि निघून जातात विकासाची कामे करत नाही असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.आज देशात विविध विकासकामे सुरू असल्याचे चित्र दिसत असताना ठाकरवाडीसारख्या गावाला जोडणाऱ्या केवळ ५०० मीटर रस्त्याचा प्रश्न अद्याप प्रलंबित राहणे ही चिंतेची बाब आहे. गावाच्या विकासासाठी रस्ते हे मूलभूत साधन मानले जाते. मात्र, ठाकरवाडीपर्यंतचा रस्ता अद्याप पक्का झालेला नसल्याने नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.पावसाळ्यात आणि उन्हाळ्यात नागरिकांची गैरसोयपक्का रस्ता नसल्यामुळे पावसाळ्यात चिखल, तर उन्हाळ्यात धूळ आणि खड्ड्यांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. या रस्त्याचा वापर करणारे ग्रामस्थ, विद्यार्थी, शेतकरी तसेच दुचाकीस्वार यांना सुरक्षित आणि सुकर प्रवासासाठी अडचणी येत आहे.गावाच्या विकासासाठी रस्ते, पाणी आणि वीज या मूलभूत सुविधांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. मात्र, ठाकरवाडीच्या रस्त्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून कायम असल्याने नागरिकांच्या अपेक्षांवर पाणी फिरत असल्याची भावना व्यक्त होऊ आहे.अवघ्या ५०० मीटर रस्त्यासाठी इतकी वर्षे प्रतीक्षा का?ठाकरवाडीपर्यंतचा रस्ता निरगुडी बु ते ठाकरवाडी चा रस्ता हा ३ कि मी अंतरचा असून त्यापैकी ठाकरवाडी जवळ अवघा ५०० मीटर रस्त्याचे डांबरीकरण किंवा काँक्रिटीकरण अद्याप का झाले नाही, हा प्रश्न नागरिकांसाठी महत्त्वाचा ठरत आहे. संबंधित विभागाने या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून कामासाठी आवश्यक निधी, प्रशासकीय मान्यता आणि अंमलबजावणी याबाबत स्पष्ट भूमिका मांडण्याची गरज आहे.प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावेठाकरवाडीच्या नागरिकांना चांगला आणि सुरक्षित रस्ता मिळणे हा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायत, बांधकाम विभाग आणि लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्त्याच्या कामासाठी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा आहे.स्वातंत्र्याची ८० वर्षे उलटूनही ठाकरवाडीच्या ५०० मीटर रस्त्याचा प्रश्न कायम असेल, तर या रस्त्याचे डांबरीकरण किंवा काँक्रिटीकरण नेमके कधी होणार? आता तरी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या प्रश्नाची दखल घेऊन ठाकरवाडीकरांना दिलासा देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## देशगव्हाणच्या हुसे परिवाराचे श्रद्धास्थान



**बदनापूर :** राळा हिवरा ता. बदनापूर येथील प्रसिद्ध जगदंबा गडावर यंदाचा दसरा महोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावात संपन्न झाला.दरवर्षीप्रमाणे यंदाही विजयादशमी निमित्त गडावर देवीची महापूजा, आरती आणि दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळपासूनच देवीच्या दर्शनासाठी रांग लागली होती.हुसे परिवाराचे श्रद्धास्थान -राळा-हिवरा येथील हा जगदंबा गड देशगव्हाण येथील हुसे परिवाराचे कुलदैवत व श्रद्धास्थान आहे. पिढ्यानपिढ्या या परिवाराची गडावर नित्य श्रद्धा असून, दरवर्षी दसरा उत्सवात परिवारातील सर्व सदस्य मोठ्या भक्तीभावाने सहभागी होतात. उपस्थित भाविकांना शुभेच्छा देण्यात आल्या.परिसरातील अनेक गावांमधून भाविक दर्शनासाठी आले होते.दसरा हा विजयाचा, शक्तीचा उत्सव. जगदंबेच्या आशीर्वादाने सर्वांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली. या प्रसंगी डॉ. महादेव हुसे, डॉ. शिवाजी हुसे, उद्धव हुसे, वसंत हुसे, जनार्दन हुसे सह परिवारासह उपस्थित होते.

## खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला अटक; किनगाव राजा पोलिसांची कारवाई




**किनगावराजा (महेश मुंढे) :** खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला अटक करण्यात किनगाव राजा पोलिसांना यश आले आहे. विजय संजय दाभाडे (वय ३१ वर्षे, रा. सावखेड तेजन, ता. किनगाव राजा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुधाकर विठोबा वाघमारे (वय ५५ वर्षे, रा. हिवरखेड, ता. सिंदखेड राजा) यांनी २२ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलिसांत तक्रार दिली. त्यांची मुलगी संजीवनी विजय दाभाडे (वय २३ वर्षे) हिचा पती विजय संजय दाभाडे याच्याशी दारू पिण्याच्या सवयीवरून वारंवार वाद होत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी किनगाव राजा पोलीस ठाण्यात अप. क्र. ३७४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपी विजय संजय दाभाडे याचा शोध घेऊन त्याला अटक केली.या पोलीस पथकाचा सहभागी कारवाई पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अमोल गायकवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या कारवाईत किनगाव राजा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. संजय मातोंडकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल अनिल नागरे, पोलीस हेड कॉन्स्टेबल सुभाष गिते, पोलीस कॉन्स्टेबल संदीप डोंगरे, पोलीस कॉन्स्टेबल गणेश वारकरी, पोलीस कॉन्स्टेबल मिलिंद सोनपसारे आणि पोलीस कॉन्स्टेबल असलम नूरंगाबादी यांनी सहभाग घेतला.खुनाच्या या गुन्ह्याचा पुढील तपास किनगाव राजा पोलीस करीत आहेत.

## पाणीटंचाईच्या झळा रोखण्यासाठी आतापासूनच सज्ज व्हा; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे प्रशासनाला सूक्ष्म नियोजनाचे निर्देश

**बीड (भगवंत पाळवदे) :** यंदा जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत मोठी घट झाली आहे. आगामी उन्हाळ्यात बीडकरांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला सामोरे जावे लागू नये, यासाठी प्रशासनाने आतापासूनच टप्प्याटप्प्याने कृती आराखडा राबवावा, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तांत्रिक दृष्ट्या सूक्ष्म नियोजन आणि लोकसहभागातून भूजल व्यवस्थापनावर भर देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. केंद्रीय भूमी जल बोर्ड (पुणे) आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (GSDA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासनाला उपाययोजनांचे काटेकोर नियोजन करण्याचे आदेश दिले. ऑक्टोबर ते डिसेंबर या पहिल्या टप्प्यामध्ये बोअरवेल आणि हातपंपांची विशेष दुरुस्ती मोहीम राबवण्यात यावी, तसेच जानेवारी ते जून या तीव्र टंचाईच्या काळासाठी यंत्रणांनी आतापासूनच सज्ज राहावे, असे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय पाणीटंचाईच्या दृष्टीने संवेदनशील असलेली गावे आणि वाड्या-वस्त्यांचा तांत्रिक अहवाल तयार करणे, गरजेनुसार खाजगी विहिरींचे वेळेवर अधिग्रहण करणे, आवश्यक त्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करणे आणि बंद असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांची तात्काळ दुरुस्ती करण्याच्या तातडीच्या सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे आणि दूषित पाण्यामुळे आरोग्याचे कोणतेही प्रश्न निर्माण होऊ नयेत, यासाठी पाण्याची नियमित गुणवत्ता तपासणी (Water Quality Testing) करणे बंधनकारक करण्यात आले आहे.पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी गावाचा पाण्याचा ताळेबंद (Water Budgeting) मांडणे अत्यंत गरजेचे असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. गावात उपलब्ध असलेले जमा पाणी आणि पिण्यासाठी व शेतीसाठी लागणारे पाणी याचा हिशोब करून लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन करावे लागणार आहे. तसेच, पिण्याचे पाणी राखीव ठेवून रब्बी हंगामात पीक पद्धतीत बदल करणे काळाची गरज आहे. जास्त पाणी लागणाऱ्या गहू व कांद्यासारख्या पिकांऐवजी हरभरा, मूग, वाटाणा आणि बाजरी यांसारख्या कमी पाण्यात येणाऱ्या व चांगले आर्थिक उत्पन्न देणाऱ्या पिकांवर शेतकऱ्यांनी भर द्यावा. यासाठी ग्रामसभेच्या माध्यमातून गावागावांत व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.महसूल, जिल्हा परिषद, कृषी विभाग आणि भूजल यंत्रणेने परस्पर समन्वयाने काम करून संभाव्य पाणीटंचाईवर मात करावी आणि शेतकऱ्यांचे हित जपावे, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी व्यक्त केली. या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीत केंद्रीय भूजल विभागाच्या शास्त्रज्ञ व्ही. हेमलता आणि शुभांशू तिवारी यांनी सविस्तर सादरीकरण केले. यावेळी स्थानिक प्रशासनातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पाण्याचा प्रत्येक थेंब मोलाचा असल्याने नागरिकांनीही पाण्याचा अत्यंत काटकसरीने वापर करावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६


## बोगस डॉक्टरांवर गोपनीय कारवाईचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या बोगस डॉक्टरांवर आता प्रशासनाकडून गोपनीय पद्धतीने धडक कारवाई केली जाणार आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच पार पडलेल्या आढावा बैठकीत आरोग्य विभागाला हे कडक निर्देश देण्यात आले आहेत. यापूर्वी २४ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांना बोगस डॉक्टरांची यादी तयार करून कारवाईचे आदेश देण्यात आले होते, त्याचाच पुढील आढावा या बैठकीत घेण्यात आला.६५ गुन्हे दाखल, अनेक प्रकरणे न्यायालयात प्रलंबितजिल्ह्यात सन २००० पासून आतापर्यंत बोगस डॉक्टरांवर एकूण ६५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी २७ प्रकरणे निकाली निघाली असून, २६ प्रकरणे अद्यापही विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. तीन प्रकरणांमध्ये शिक्षेबाबतची कार्यवाही प्रलंबित आहे, तर दोन प्रकरणांवर छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात सुनावणी बाकी आहे. याशिवाय, १४ ऑगस्ट रोजी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या एका गुन्ह्याचा सध्या कसून तपास सुरू आहे. बैठकीत २००२ मधील बंगालच्या एका आरोपीशी संबंधित प्रलंबित प्रकरणावरही (गुन्हा क्रमांक ६४) सविस्तर चर्चा करण्यात आली.तालुका समित्यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी, आता कारवाई होणार 'गोपनीय'आरोग्य विभागाने २० सप्टेंबर २०२६ ते १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १४२ नर्सिंग होमसह एकूण १६१ वैद्यकीय संस्थांचे सर्वेक्षण केले. या मोहिमेत काही बोगस डॉक्टर आढळून आले. मात्र, तालुकास्तरीय समितीने त्यांच्यावर प्रभावी व ठोस कारवाई न केल्याची बाब बैठकीत समोर आली. यावर नाराजी व्यक्त करत जिल्हाधिकाऱ्यांनी यापुढे अशा डॉक्टरांवर थेट 'गोपनीय' पद्धतीने कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, जिल्ह्यात केवळ 'बॉम्बे नर्सिंग ॲक्ट' (Bombay Nursing Act) अंतर्गत रीतसर नोंदणीकृत असलेल्या दवाखान्यांनाच वैद्यकीय सेवा देण्याची परवानगी असेल, याची खात्री करण्याचे आदेशही प्रशासनाला देण्यात आले आहेत.माजलगावमधील 'त्या' बोगस डॉक्टरवर थेट कारवाईचे आदेशया बैठकीत माजलगावमधील एका गंभीर प्रकरणावर विशेष चर्चा झाली. माजलगावमध्ये 'विश्वास' नावाच्या एका व्यक्तीवर २००३ पासून अनेक गुन्हे दाखल असल्याची नोंद घेण्यात आली. सदर व्यक्ती इलेक्ट्रो-होमिओपॅथी किंवा होमिओपॅथीचे नाव सांगून प्रत्यक्षात रुग्णांना ॲलोपॅथीची औषधे देत असल्याचे आणि चक्क रुग्णांना क्लिनिकमध्ये दाखल (Admit) करून घेत असल्याचे तपासणीत उघड झाले आहे.एमएमपी (MMP) कायदा १९६१ च्या कलम २ नुसार, इलेक्ट्रो-थेरपी किंवा फिजिओथेरपी करणाऱ्यांना कायदेशीररित्या वैद्यकीय व्यावसायिक मानता येत नाही. जर अशा व्यक्तींनी ॲलोपॅथीचा वापर केला, तर त्यांना थेट बोगस ठरवून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश बैठकीत देण्यात आले. अशा बोगस डॉक्टरांचे दवाखाने केवळ सील न करता ते कायमस्वरूपी बंद करावेत, जेणेकरून ते अन्यत्र पुन्हा नव्याने सुरू होणार नाहीत, अशी ठाम भूमिका या बैठकीत मांडण्यात आली.लॅब आणि जाहिरातींवरही प्रशासनाची नजरबोगस डॉक्टरांसोबतच पॅथॉलॉजी लॅब आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवरही प्रशासनाने लक्ष केंद्रित केले आहे. लॅबमध्ये रक्त काढणारे कर्मचारी (Phlebotomist) हे प्रशिक्षित असणे बंधनकारक करण्यात आले असून, तसे न आढळल्यास संबंधित लॅबवर थेट कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच, लोकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि दिशाभूल करणाऱ्या वैद्यकीय जाहिरातींवर तातडीने कारवाई करण्याचे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

## गर्भाशय शस्त्रक्रियेसाठी आता परवानगी अनिवार्य

**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आणि विविध आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच आरोग्य विभागाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीत जिल्ह्यातील महिलांच्या गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रिया, घटते लिंग गुणोत्तर, सोनोग्राफी केंद्रांची तपासणी आणि विविध आरोग्य योजनांबाबत अत्यंत महत्त्वपूर्ण व कठोर निर्णय घेण्यात आले आहेत. प्रशासनाने घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे आता वैद्यकीय क्षेत्रातील कारभारात अधिक पारदर्शकता येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.बीड जिल्ह्यामध्ये महिलांच्या गर्भाशय काढण्याच्या (हिस्टेरेक्टोमी) शस्त्रक्रियांचे प्रमाण हा नेहमीच एक संवेदनशील आणि कळीचा मुद्दा राहिला आहे. यावर कायमस्वरूपी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाने आता अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. यापुढे जिल्ह्यातील कोणत्याही खासगी किंवा शासकीय रुग्णालयामध्ये गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करायची असल्यास, त्याला जिल्हा शल्यचिकित्सकांची (सिव्हिल सर्जन) पूर्वपरवानगी घेणे सक्तीचे करण्यात आले आहे. बैठकीतील सादरीकरणादरम्यान शासकीय रुग्णालयांच्या तुलनेत खासगी रुग्णालयांमध्ये या शस्त्रक्रियांचे प्रमाण लक्षणीयरीत्या जास्त असल्याचे निदर्शनास आले. शासकीय रुग्णालयांमध्ये अत्यंत आवश्यक असल्यासच आणि योग्य त्या वैद्यकीय प्रक्रियेचे पालन करूनच या शस्त्रक्रिया केल्या जातात. मात्र, खासगी रुग्णालयांचा वाढता आकडा चिंताजनक असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या तफावतीवर तीव्र शब्दांत विचारणा केली. अनावश्यक शस्त्रक्रियांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली २५ फेब्रुवारी रोजीच एक जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, आता प्रत्येक शस्त्रक्रियेची सविस्तर माहिती प्रशासनाला देणे रुग्णालयांना बंधनकारक असणार आहे.दुसरीकडे, जिल्ह्यातील घटते लिंग गुणोत्तर हा प्रशासनासाठी मोठा चिंतेचा विषय ठरत आहे. चालू वर्षात एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर ८६२ इतके नोंदवले गेले आहे. हे प्रमाण वाढवण्यासाठी आणि बेकायदेशीर गर्भलिंग निदान रोखण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय दक्षता पथकाची विशेष बैठकही यावेळी पार पडली. जिल्ह्यात १६ एप्रिल ते १५ मे या काळात सोनोग्राफी केंद्रांची कसून तपासणी करण्यात आली असून, अचानक तपासणी करण्यासाठी प्रत्येकी तीन डॉक्टरांचा समावेश असलेली तब्बल १७ पथके स्थापन करण्यात आली आहेत. पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत एकूण २८ न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात आली होती. त्यापैकी २३ प्रकरणे निकाली निघाली असून ७ प्रकरणांमध्ये संबंधितांना शिक्षाही झाली आहे. मात्र, बेकायदेशीर लिंगनिदान रोखण्यासाठी 'डिकॉय' (Decoy) केसेस करण्यासाठी सामान्य नागरिक स्वतःहून पुढे येत नसल्याची खंत अधिकाऱ्यांनी या बैठकीत व्यक्त केली. लिंग गुणोत्तर वाढवण्यासाठी सध्या १० तालुकास्तरीय कार्यशाळा, ग्रामसभा आणि 'आकाशवाणी बीड'च्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जात आहे.या आढावा सत्रात शालेय मुलींचे आरोग्य आणि लसीकरणावरही सविस्तर चर्चा झाली. १४ ते १५ वर्षे वयोगटातील शालेय मुलींसाठी सुरू असलेली लसीकरणाची मोहीम आता ३१ डिसेंबरपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयांच्या माध्यमातून हे लसीकरण वेगाने सुरू आहे. तसेच जिल्ह्यात गोवर-रुबेलाचे २४८ संशयित रुग्ण आढळले असून त्यापैकी १०२ जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आले असले, तरी सुदैवाने याची कोणतीही मोठी साथ नसल्याचे आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. याव्यतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडील पी. एम. राहत कॅशलेस योजना आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'मिशन एड्स सुरक्षा' अभियानाचाही आढावा घेण्यात आला. या अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीची बैठक पार पडली.दरम्यान, आरोग्य विभागाने नुकत्याच राबवलेल्या एका संवेदनशील आणि अभिनव उपक्रमाचे या बैठकीत विशेष कौतुक करण्यात आले. नवरात्रोत्सवाच्या काळात जिल्ह्यातील सिव्हिल हॉस्पिटल आणि महिला रुग्णालयात मुलीला जन्म देणाऱ्या मातांना साडी आणि नवजात बालिकेला कपडे वाटप करण्याचा विशेष उपक्रम राबवण्यात आला. समाजात मुलींच्या जन्माचे स्वागत अधिक आनंदाने आणि उत्साहाने व्हावे, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबवल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या धडक आढाव्यामुळे आरोग्य विभागाच्या कामकाजाला आता नवी दिशा मिळाली असून, सर्वच स्तरांवर कामाला गती आली आहे.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६

## बीड जिल्ह्यात शेतकरी कर्जमुक्तीची चौथी यादी जाहीर; ४ हजार ७९१ शेतकऱ्यांना दिलासा, उर्वरित ४५ हजार शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणाचे आवाहन

**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत बीड जिल्ह्यातील कर्जमुक्तीस पात्र शेतकऱ्यांची चौथी यादी गुरुवार, २२ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या चौथ्या यादीत जिल्ह्यातील ४ हजार ७९१ शेतकऱ्यांच्या थकीत पीक कर्जाचा समावेश करण्यात आला असून, ऐन सणासुदीच्या काळात या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यामध्ये राष्ट्रीयकृत बँकांच्या ३१४५ आणि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १६४६ शेतकऱ्यांच्या थकीत पीक कर्जाचा समावेश आहे. या लाभार्थ्यांच्या याद्या संबंधित ग्रामपंचायती, सेवा सहकारी संस्था आणि बँकांच्या शाखांमध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.ही योजना जाहीर झाल्यापासून आतापर्यंत महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील एकूण २ लाख ४ हजार ६१ थकीत शेतकऱ्यांना कर्जमुक्ती मिळाल्याबाबतची यादी प्रसिद्ध केली आहे. यापैकी आतापर्यंत १ लाख ५८ हजार ५९८ शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे, तर अद्याप ४५ हजार ४६३ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केलेले नाही. पहिली व दुसरी यादी प्रसिद्ध झाल्यानंतर शेतकऱ्यांनी केलेल्या आधार प्रमाणीकरणानुसार महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यासाठी एकूण ९१८.५६ कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यापैकी राष्ट्रीयकृत बँक व महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या थकीत १ लाख ४ हजार ६२४ कर्जदारांच्या खात्यात ८८५.०७ कोटी रुपये, तर बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६२५४ थकीत कर्जदारांच्या खात्यात ३३.४९ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत.नव्याने प्रसिद्ध करण्यात आलेली ही चौथी यादी संपूर्ण कर्जमुक्तीची असून, या यादीतील शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा पूर्ण लाभ दिला जात आहे. विशेष म्हणजे, या यादीमध्ये एकापेक्षा जास्त बँकांकडून पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. या यादीतील शेतकऱ्यांच्या कर्जबाकीची रक्कम ३१ मार्च २०२६ रोजीची ग्राह्य धरण्यात आली असून, १ एप्रिल २०२६ नंतरचे व्याज व इतर खर्च माफ करण्यात येणार आहेत. तसेच, या यादीतील राष्ट्रीयकृत आणि व्यापारी बँकांशी संबंधित काही शेतकऱ्यांची ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा जास्त असली तरी, शासनाच्या हेअर कट धोरणानुसार ही सर्व कर्जे निरंक करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या कर्ज थकबाकीची खातरजमा करून नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आपले आधार प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे.ज्या लाभार्थ्यांचे वय जास्त आहे, ज्यांच्या बोटांचे ठसे उमटत नाहीत किंवा जे लाभार्थी मयत झाले आहेत, अशा शेतकऱ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ देण्यासाठी शासनाने १९ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष मानक कार्यप्रणाली (SOP) निर्गमित केली आहे. शासनाने प्रसिद्ध केलेली ही चौथी यादी अंतिम नसून, ज्या पात्र शेतकऱ्यांची नावे पहिल्या चार याद्यांमध्ये आलेली नाहीत, त्यांची नावे पुढील प्रसिद्ध होणाऱ्या यादीमध्ये येऊ शकतात. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांची नावे यादीत आहेत, त्यांनी स्वतःचे आधार कार्ड आणि बँक पासबुक सोबत घेऊन आपले सरकार सेवा केंद्रावर जावे व यादीतील विशिष्ट क्रमांक देऊन विनाशुल्क ई-केवायसी (E-KYC) पूर्ण करून घ्यावे. प्रमाणीकरण झाल्यानंतर कर्जमुक्तीची रक्कम थेट त्यांच्या कर्ज खात्यावर जमा केली जाणार आहे.ज्या शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमुक्तीची रक्कम जमा झाली आहे, त्यांना त्वरित नवीन पीक कर्ज वाटप करण्याबाबत जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला स्पष्ट सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आधार प्रमाणीकरण शिल्लक असलेल्या उर्वरित ४५ हजार ४६३ शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करून कर्जमुक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) सतीश तोटावार यांनी केले आहे.

## चांगला माणूस निर्माण होण्याचे कौशल्य सामाजिक शास्त्रातून मिळते - डॉ. सुभाष चव्हाण



**कन्नड :** सामाजिक शास्त्रातील विविध विषयातून मिळणाऱ्या ज्ञानातून सामाजिक जाणीव निर्माण होते. संघभावना, सामाजिक बांधिलकी वाढीस लागते. संवाद कौशल्य विकसीत होत असते असे प्रतिपादन डॉ. सुभाष चव्हाण यांनी केले. कन्नड दि.२२ ऑक्टोबर रोजी येथील शिवाजी महाविद्यालयातील सामाजिक शास्त्र मंडळाच्या उदघाटन प्रसंगी बोलताना डॉ. सुभाष चव्हाण ( संचालक, ज्ञानस्रोत केंद्र, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर)यांनी विद्यार्थानी शिक्षण घेत असतानाच विविध सामाजिक उपक्रमातून ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे ज्यातून व्यवहारिक ज्ञान मिळते, सामाजिक प्रश्न समजण्यास मदत होते तर क्षेत्र भेटीच्या माध्यमातून परिसराचा इतिहास समजून घ्यावा, शिवाय विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा अधिकाधिक वापर केला पाहिजे, सद्या ग्रंथलयाचे स्वरूप बदलत चालले आहे. ऑनलाइन माहितीचा योग्य वापर करावा, मिळणारी माहिती पडताळून पाहत चला असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव चंद्रकांतजी देशमुख हे होते तर व्यासपिठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सामाजिक शास्त्र कार्यकारीणी मंडळाचे उदघाटन करण्यात आले. त्यानंतर सामाजिक शास्त्र अंतर्गत महात्मा गांधी विचार व कार्य याविषयावर आधारीत विविध विषयावरील भिंतीपत्रकांचे विमोचन करण्यात आले. या प्रसंगी सामाजिक शास्त्र मंडळ कार्यकारिणी अध्यक्ष कु. कामिनी सोनवणे हीने मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ विजय भोसले यांनी मनोगत व्यक्त करताना सामाजिक शास्त्राच्या माध्यमातून सामाजिक समस्यांचे निराकरण करता येते तेंव्हा विद्यार्थांनी सामाजिक समस्याचा अभ्यास करावा असे सांगितले तर अधक्षीय समारोप प्रसंगी बोलताना श्री चंद्रकांतजी देशमुख यांनी महात्मा गांधी विचार व कार्याची वर्तमानातील प्रासंगिकताचे महत्व सांगून सामाजिक शास्त्र मंडळाच्या कार्यकारिणीच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. पुजा चव्हाण या विद्यार्थीनीने केले, प्रास्ताविक डॉ. सिताराम मोगल यांनी केले तर आदित्य नाडे याने आभार व्यक्त केले. या प्रसंगी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




